संपादकीय

# ‘आनंदवन’ चे संस्कार

‘आनंदवन’ आणि बाबा आमटे या व्यक्तीविषयी माझ्या मनात प्रथम कुतूहल निर्माण झाले, ते ‘ज्वाला आणि फुले’ हे त्यांचे आत्मचिंतनपर पुस्तक वाचल्यानंतर. तेव्हापासून माझ्या मनात आनंदवनासारखे काही करावे असे नेहमी वाटत होते. पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर मी पहिला निर्णय कुठला घेतला असेल, तर तो म्हणजे बाबा आमटे यांच्या आनंदवनात विद्यार्थ्यांना पाठवण्याचा. विद्यार्थ्यांनी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा, त्यांना समाजाशी वेगळी नाळ जोडता येईल का? हा आणि अशा अनेक प्रश्नांची उकल या माध्यमातून व्हावी व इतरांपेक्षा एक वेगळा युवक तयार व्हावा अशी यामागील भावना होती.

बाबा आमटे यांची उंची, साहित्य शास्त्राच्या किंवा भौतिकातल्या फुटपट्टीने मोजण्यापेक्षा, त्यांच्या नवविचारांची प्रेरणा, मनामनात पाझरलेल्या माणुसकीत चैतन्यपूर्ण मानवनिर्मितीत केलेल्या शेकडो प्रयोगात बघता येईल. एकेकाळी महारोगाने ग्रस्त झालेली माणसे, धट्ट्या-कट्ट्या माणसापेक्षा जास्त आत्मविश्वासाने काम करतात. रोज कामाचे नवे डोंगर उचलत, हे सिद्ध करणारा आत्मा म्हणजे आनंदवन! बाबा एके ठिकाणी म्हणतात,

पांगळ्यांना सोबतीला येऊ द्या बलदंड बाहू
निर्मितीच्या मुक्तगंगा, द्या येथे मातीत वाहू
नांगरू स्वप्ने उद्याची, येथील फलतील शेती
घाम गाळील ज्ञान येथे, येथून उठतील नेते

या आत्मविश्वासपूर्ण ओळीतून उद्याची क्षितिजे कवेत घेणारा तरुण मला दिसला आणि म्हणूनच मी निर्णय घेतला, चलो आनंदवन ! राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण मंडळाने ही योजना उचलून धरली आणि ३५० विद्यार्थी आनंदवनात गेले. या विद्यार्थ्यांमध्ये खरोखरच बदल झाला.

‘सोमनाथ’ येथे झालेल्या श्रमछावणीमध्ये ज्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता, ते सर्व विद्यार्थी आज आपल्या महाविद्यालयामध्ये आनंदवन तसेच सोमनाथ येथे बाबा आमटे यांनी केलेल्या कार्याचे गुणगान करीत आहेत. या सर्व उभारणीमध्ये बाबा आमटे, साधनाताई



**‘नांगरू स्वप्ने उद्याची,**
**येथील फलतील शेती**
**घाम गाळील ज्ञान येथे,**
**येथून उठतील नेते।’**
**बाबा आमटे यांच्या या विचारकाव्यातून उद्याची क्षितिजे कवेत घेणारा तरुण दिसतो आणि म्हणूनच पुणे विद्यापीठातून साडेतीनशे विद्यार्थी आनंदवनात जाऊन आले. ‘आनंदवना’च्या संस्कारांची महती सांगताहेत पुणे विद्यापीठाचे कुलगुरु**
**डॉ. नरेंद्र जाधव.**

आमटे यांना मूळगव्हाण येथे अत्यंत तळमळीने काम करताना पाहून आमच्या विद्यार्थ्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. समाजामध्ये इतकी तळमळीने काम करणारी माणसे या विद्यार्थ्यांनी कधीही पाहिलेली नव्हती. त्यामुळे त्यांना आश्चर्य वाटणे साहजिक होते. विद्यार्थी महाविद्यालयामधून पुस्तकीज्ञान चार भिंतीमध्ये बसून काही तासांपुरते घेतात, परंतु ते ज्यावेळी समाजामध्ये वावरतात त्यावेळी मात्र त्यांना वेगवेगळे अनुभव येतात.

आज आनंदवनचा वटवृक्ष विस्तारला असून, अशोकवन खंबाडा, सालोरी, मासाळ, गोरक्षन, खामणचेरु, नागेपल्ली, हेमलकसा (भामरागड), मूळगव्हाण इत्यादी ठिकाणी विकासाच्या नव्या दिशा गाठल्या आहेत. सन १९४९ मध्ये बाबांनी महारोगी सेवा समितीची स्थापना केली. गेल्या ५७ वर्षांत जागतिक पातळीवर नोंद घेतला गेलेला, कुष्ठरोगी आणि अपंगाचा आनंदवन हा जगातील सर्वांत मोठा प्रकल्प आहे. ज्यांना समाजाने नाकारले, वाळीत टाकले, स्वकियांनी झिडकारले, अशा हजारो असहाय, अपंग, कुष्ठरोगी माणसांना येथे घर मिळाले. बाबांच्या शब्दांत देहाच्या कुष्ठरोगापेक्षा मनातले कुष्ठरोग घालवणे अत्यंत कठीण आहे. जवळजवळ ६० हजार व्यक्तींना इथे नवजीवन मिळाले आहे. बाबांनी वयाच्या ३६व्या वर्षी साधनाताई आणि दोन छोट्या मुलांबरोबर (प्रकाश व विकास) फक्त १४ रुपयांच्या पुंजीवर माळरानावर सुरू केलेले काम आज आनंदवनात परावर्तित झालेले आहे. प्राण्यांवरील माया, कुष्ठरोग्यांवरील प्रेम, आदर, अपंग, अंध, पीडित अशा सर्व लोकांसाठीचे काम, गोकुळ, भारत जोडो प्रकल्प, लोकबिरादारी, श्रमप्रतिष्ठा, टाकाऊतून-टिकाऊ, प्लॅस्टीकचा पुनर्वापर (आजही आम्ही प्लॅस्टिक निर्मूलन करताना ते जाळावे की पुरावे या संभ्रमात असतो.) गोळा केलेल्या प्लॅस्टिकच्या बारीक तुकड्यांपासून गादी, उशा अशा अनेक वस्तू (washable) तयार होऊ शकतात. हे सर्व फक्त बाबाच करू शकतात. इथे कल्पनेला नुसता जन्म नाही मिळत तर तिला नवीन कोंबही फुटतात. रस्ता तयार करताना टाकाऊ प्लॅस्टिकचा वापर, बंधारे बांधताना वापरलेले, फेकून दिलेले टायर, वापरलेल्या ‘क्ष’ किरण फिल्मचा उपयोग, सजावटीसाठी फुलदाणी, पत्रपेटी यासाठी केळीच्या सोट्याच्या सालीपासून ग्रिटिंग्ज, कॅनव्हास निर्मिती... लिहावे तेवढे थोडे. हे सर्व विद्यार्थ्यांनी पाहावे, कृतीत आणावे, म्हणून आनंदवनात दहा दिवस हा प्रयोग राबविला गेला आणि कमालीचा यशस्वीही झाला.

लोकमत 10/2/07.

# ‘विद्यापीठाच्या निधीवर राज्य सरकारचा डोळा’

## विद्यापीठाचा वर्धापनदिन : पुरस्कारांचे वितरण

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १० : विद्यापीठाकडे असलेल्या निधीवर राज्य सरकारचा डोळा आहे, या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने या निधीचा वापर विद्यार्थ्यांवरील चांगल्या योजनांसाठी खर्च करावा, अशी अपेक्षा सामाजिक कार्यकर्ते रामनाथ वाघ यांनी आज येथे व्यक्त केली.

विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणाऱ्या ‘जीवन साधना गौरव पुरस्कारा’ने वाघ यांना आज सन्मानित करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. अभिनेते निळू फुले, नाशिक येथील बेंजन देसाई यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले. बाबूराव बागूल, डॉ. सरोजिनी बाबर हे आजारपणामुळे या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. कुलगुरू डॉ. जाधव स्वतः घरी जाऊन त्यांना पुरस्कार प्रदान करणार आहेत. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे हेदेखील आजारी असल्याने या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. पद्मभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी कुलगुरू डॉ. वसंतराव गोवारीकर यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. दि. द. ढवळे यांना प्राचार्य व्ही. के. जोग पुरस्काराने गौरविण्यात आले.

वाघ म्हणाले, “विद्यापीठाच्या निधीवर राज्य सरकारचे लक्ष जाण्याआधीच विद्यापीठाने हा निधी विद्यार्थ्यांसाठी खर्च करावा. विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील अनेक विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल.” मोहन धारिया म्हणाले, “उपेक्षित घटकाला सामाजिक आणि आर्थिक पातळीवर न्याय देणारा विकास झाला तर सामाजिक असंतोष निर्माण होणार नाही, अन्यथा देशात फोफावलेला नक्षलवाद अटळ आहे.”

डॉ. जाधव यांचे अध्यक्षीय भाषण झाले. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी घेण्यात आलेल्या निबंधलेखन स्पर्धेत संध्या हांडे, प्रमोद भडकवाडे व विप्रदास मृणाल यांना पुरस्कार देण्यात आला.

सकाळ 11/2/07

चिंतन इमेज मेकर्स